**Date: 01/10/2021**

# भालोद महाविद्यालयातर्फे दत्तक गाव- डोंगर कठोरा येथे ग्राम वाचन कट्टयाचे उद्घाटन

भालोद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **दत्तक गाव डोंगर कठोरा** येथे '**कवयित्री बहिणाबाई ग्राम वाचन कट्टयाचे**' दि.**०१/१०/२०२१** रोजी उद्घाटन करण्यात आले. महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे एक गाव दत्तक घेण्यात येते असते. या दत्तक गावात दरवर्षी सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात येते. त्यामार्फत दत्तक गावाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्य विषयक इ. विविध समस्यांवर रासेयो स्वयंसेवकाद्वारे काम केले जाते. दत्तक गावाचा सर्वांगिण विकास व्हावा, शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करून गावाच्या विकासात, प्रगतीत प्रत्येक गावकऱ्यांचा हातभार लागावा यासाठी नागरिकांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे महत्त्वाचे आहे. त्यांच्यातील वाचन संस्कृती लुप्त होऊ नये यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत दत्तक गावात कवयित्री बहिणाबाई ग्राम वाचन कट्टा स्थापन करावा असा विद्यापीठाचा मानस आहे. या उपक्रमांतर्गत दत्तक गाव डोंगर कठोरा ता. यावल येथील जि. प. प्राथामिक मराठी शाळेत आज कवयित्री बहिणाबाई ग्रामवाचन कट्टयाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या निर्देशानुसार वाचन कट्टा नियंत्रण समिती गठित करण्यात आली**. महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक वृंदयांच्या सहकार्याने या वाचन कट्टयास रुपये ६८५०/- किंमतीची पुस्तके भेट म्हणून उपलब्ध करून देण्यात आली.** या पुस्तकांमध्ये कथा-कादंबरी, नाटके, ऐतिहासिक पुस्तके, क्रांतीकारकांची पुस्तके, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. **अरुणोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष व ग्राम पंचायत सदस्य मा. श्री. डॉ. राजेंद्र चुडामण झांबरे** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मा.श्री.नवाज बिस्मिल्ला तडवी, जि. प. प्राथमिक शाळा केंद्र प्रमुख श्री. महंमद हबीब तडवी, शिक्षक संघटना यावल तालुका अध्यक्ष श्री. श्रीकांत मोटे, शालेय समितीचे अध्यक्ष श्री. बाळू आढाळे हे उपस्थित होते.


















देशदूत दि.०८ ऑक्टोबर २०२१

## भालोद महाविद्यालयातर्फे दत्तक गाव- डोंगर कठोरा येथे ग्राम वाचन कट्ट्याचे उद्घाटन

**भालोद, ता.यावल । वार्ताहर**



सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय भालोद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दत्तक गाव डोंगर कठोरा येथे कवयित्री बहिणाबाई ग्राम वाचन कट्ट्याचे दि.०१ ऑक्टोबर रोजी उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकका तर्फे एक गाव दत्तक घेण्यात येते असते. या उपक्रम ंतर्गत दत्तक गाव डोंगर कठोरा ता. यावल येथील जि.प.प्राथमिक मराठी शाळेत कवयित्री बहिणाबाई ग्राम वाचन कट्ट्याचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या निर्देशानुसार वाचन कट्टा नियंत्रण समिती गठित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक वृंद यांच्या सहकार्याने या वाचन कट्ट्यास रुपये ६८५०/- किंमतीची पुस्तके भेट म्हणून उपलब्ध करून देण्यात आली. या पुस्तकांमध्ये कथा-कादंबरी, नाटके, ऐतिहासिक पुस्तके, क्रांतीकारकांची पुस्तके, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अरुणोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य मा.श्री. डॉ. राजेंद्र चुडामण झांबरे, सरपंच नवाज बिस्मिल्ला तडवी, शालेय समितीचे अध्यक्ष बाळू आढाळे, केंद्र प्रमुख महंमद हबीब तडवी, मुख्याध्यापक जि. प प्राथमिक मराठी शाळा दिवाकर सरोदे, शिक्षक संघटना यावल तालुका अध्यक्ष श्रीकांत मोटे, मुख्याध्यापक जि.प. शाळा डोंगरदे मा.श्री. मुबारक तडवी, पोलिस पाटील राजरत्न आढाळे आजी- माजी रासेयो स्वयंसेवक तसेच वाचन कट्टा नियंत्रण समितीतील सदस्य आवर्जुन उपस्थित होते.

अरुणोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य डॉ. राजेंद्र चुडामण झांबरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच नवाज बिस्मिल्ला तडवी, जि.प. प्राथमिक शाळा केंद्र प्रमुख महंमद हबीब तडवी, शिक्षक संघटना यावल तालुका अध्यक्ष श्रीकांत मोटे, शालेय समितीचे अध्यक्ष श्री. बाळू आढाळे हे उपस्थित होते.

या वाचन कट्ट्याच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. झांबरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हा ग्राम वाचन कट्टा ग्रामस्थ व जि. प. प्राथमिक मराठी शाळा यांच्या समन्वयाने उत्तम प्रकारे चालवावा व सर्व ग्रामस्थांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनही केले.

विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी या वाचन कट्टया अंतर्गत होणाऱ्या विविध उपक्रमांमधून कशा प्रकारे लाभ घेता येईल याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी या प्रसंगी वाचन कट्ट्यास पुस्तके/ ग्रंथ घेण्यासाठी रुपये १०००/- ची देणगी दिली. डोंगर कठोरा गावचे सरपंच व वाचन कट्टा समितीचे अध्यक्ष नवाज तडवी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले व वाचन कट्टा उत्तमरित्या चालविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. जि.प.प्रा. मराठी शाळेचे मुख्याध्यापक व वाचन कट्ट्याचे सचिव दिवाकर सरोदे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, वाचाल तर वाचाल. पुस्तके ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने शाळेत शिक्षण घेत असताना शाळेच्या वेळेत या वाचन कट्ट्यातील पुस्तकांचे वाचन केले पाहिजे व आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणला पाहिजे. या प्रसंगी त्यांनी वाचन कट्ट्यास पुस्तके घेण्यासाठी रुपये ५००/- देणगी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पद्माकर सावळे तर सूत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. दिनेश महाजन यांनी केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी केले.या वाचन कट्ट्यासाठी प्राचार्य डॉ. ए.एस. कोल्हे, प्रा.डॉ. जे. एस. मेढे, प्रा. डॉ. ए.आर. वर्डिकर, प्रा. डॉ. जी. आर. चौधरी, प्रा.डॉ. एस. एन. नेवे , प्रा.डॉ. व्ही.पी. पवार, प्रा.डॉ. डि. ए. खोब्रागडे, प्रा.आर.पी. चौधरी, प्रा.डॉ. डि. आर. महाजन, प्रा.डॉ. पी.ए. सावळे यांनी पुस्तके/ ग्रंथ भेट दिली आणि या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. या वाचन कट्ट्याच्या उदघाटन प्रसंगी शाळेतील शिक्षक श्री. इस्माई तडवी, शिक्षिका सौ. सुलोचना सरोदे, सौ विजया पाटील, वाचन कट्टा सदस्य श्री. कलेश कोल्हे व आजी माजी रासेयो स्वंयसेवक आणि शाळेतील विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**Date: 31/10/2021**

# भालोद महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी

# राष्ट्रीय एकात्मतेची शपथ

भालोद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने **सरदार वल्लभभाई पटेल जयंती** निमित्ताने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविदयालयाचे प्र. प्राचार्य डॉ.ए.एस्.कोल्हे यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले. या कार्यक्रमात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी. ए. सावळे यांनी महाविद्यालयात उपस्थित विद्यार्थ्यांना **राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ** दिली. **राष्ट्रीय एकता दिवसा निमित्त** महाविद्यालय परिसरात **एकता दौडीचे आयोजन** करण्यात आले होते. महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.सुनिल नेवे यांचे **'राष्ट्रीय एकता दिवस'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हे व्याख्यान Zoom meeting वर Online पध्दतीने घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ए.एस्.कोल्हे हे होते. कार्यक्रम दि. **३१/१०/२०२१** रोजी संपन्न झाले.











**Date: 26/11/2021**

# भालोद महाविद्यालयात संविधान दिवस साजरा

भालोद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने **२६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस** म्हणून साजरा करण्यात आला. प्रमुख व्याख्याते म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख **प्रा. डॉ. सुनिल नेवे** हे होते. त्यांचे **'संविधान दिवस'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पद्माकर सावळे यांनी केले व या कार्यक्रमाचा उद्देश समजावून सांगितला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सुनिल नेवे यांनी आपल्या व्याख्यानात संविधान सभेच्या निर्मितीची कारणे विषद करून सांगितली. तसेच भारतीय विधानाचे महत्त्व, संविधानाने सर्व भारतीयांना दिलेले हक्क, अधिकार व कर्तव्ये, याबाबत सविस्तर माहिती दिली. उपस्थितांना संविधाना प्रति त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे प्र. प्राचार्य के. जी. चौधरी हे होते.
























## देशदूत सोमवार दि. २९ नोव्हेंबर २०२१ पान क्र. ९.




### भालोद महाविद्यालय

▶▶ भालोद, ता.रावेर । वार्ताहर

सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय भालोद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य के.जी. चौधरी हे होते. प्रमुख व्याख्याते म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुनिल नेवे हे होते. त्यांचे 'संविधान दिवस' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पद्माकर सावळे यांनी केले व या कार्यक्रमाचा उद्देश समजावून सांगितला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सुनिल नेवे यांनी आपल्या व्याख्यानात संविधान सभेच्या निर्मितीची कारणे विषद करून सांगितली. उपस्थितांना संविधानाप्रति त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली. डिसेंबर १९४६ मध्ये संविधान सभेची निर्मिती झाली. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीची पहिली बैठक झाली. २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीची शेवटची बैठक झाली. घटना निर्मितीसाठी २ वर्ष ११ महिने १७ दिवस एवढा कालावधी लागला. सुरुवातीला भारताच्या राज्यघटने मध्ये ३९५ कलमे व ८ परिशिष्टे होती. १९८० पर्यंत संविधानात एकूण ४४ दुरुस्त्या झाल्या व आज भारतीय राज्यघटनेमध्ये ४४५ कलमे २५ भाग व १२ परिशिष्टांचा समावेश आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने संविधानाचा मसुदा मंजुर केला म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस भारताचा प्रत्येक नागरिक संविधान दिवस म्हणून साजरा करत आहे, अशी माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी केले तर आभार प्रदर्शन रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. दिनेश महाजन यांनी केले.

या कार्यक्रमास प्रा.मुकेश चौधरी, प्रा.डॉ.ए.आर. वडीकर, प्रा.डॉ. दिनेश पाटील, प्रा.डॉ.वर्षा नेहेते आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मिनाक्षी वाघुळदे, प्रा.डॉ. दिनेश महाजन, तुळशीराम पाटील, बाळकृष्ण चौधरी, कल्याण चौधरी, मुबारक तडवी, व रासेयो स्वंयसेवकांनी परिश्रम घेतले.

**Date: 06/12/2021**

# भालोद महाविद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव, बोधीसत्व, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त** अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस्. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी प्राचार्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख **प्रा. डॉ. जतिनकुमार मेढे** यांचे **'आधुनिक भारताच्या निर्मितीचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर'** या विषयावर भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करतांना भारतीय राज्य घटनेतील मूलभूत अधिकार, न्याय, समता व बंधुता, आणि अभिवृत्ती स्वातंत्र्यावर उपस्थितीत विदयार्थांना मार्गदर्शन केले. बाबासाहेबांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा मूलभूत अधिकार तर दिलाच त्याच बरोबर भारतातील असंख्य जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती, उपासना पध्दतीच्या, विविध आर्थिक व सामाजिक भिन्नता असलेल्या लोकांना एकाच व्यवस्थेअंतर्गत आणून न्याय, समता व बंधुता ही लोकशाहीची तत्त्वे दिली. म्हणूनच डॉ. बाबासाहेब हेच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात असे आपल्या मार्गदर्शनपर मनोगतातून सांगितले.









दै. देशदूत १२डिसेंबर२०२१ रविवार

## भालोद महाविद्यालयात महामानवास अभिवादन

भालोद, ता.यावल । प्रतिनिधी


सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. महामानव, बोधीसत्व, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्य डॉ. अजय सोमा कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी प्राचार्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना रावेर विभाग समन्वयक प्रा.डॉ. आशुतोष वर्डीकर आणि महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. जतिनकुमार मेढे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याप्रसंगी डॉ. मेढे यांचे ब आधुनिक भारताच्या निर्मितीचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब या विषयावर भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करतांना भारतीय राज्य घटनेतील मूलभूत अधिकार, न्याय, समता व बंधुता, आणि अभिवृत्ती स्वातंत्र्यावर उपस्थितीत विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. पद्माकर सावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वायुळदे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनिल नेवे, प्रा. मुकेश चौधरी, प्रा.डॉ. के.जी. चौधरी, प्रा.राकेश चौधरी, प्रा.डॉ. जी.आर. चौधरी, प्रा. डी. बी. चौधरी, प्रा. एच.टी. इंगळे, प्रा.डॉ. मुकेश पवार, प्रा. डॉ. दिगंबर खोब्रागडे, प्रा.चंद्रकांत वानखेडे, प्रा. मोहिनी तायडे, प्रा. मौसमी चौधरी, दिलीप इंगळे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. पंकज नेहेते, तुळशिराम पाटील, किशोर चौधरी, बाळकृष्ण चौधरी,कल्याण चौधरी, रोहिदास पाटील व रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

**Date: 16/12/2021**

# भालोद महाविद्यालयात आजादी काअमृत महोत्सव या उपक्रमाअंतर्गत 'भारत की नदियों का उत्सव' या विषयावर व्याख्यान

भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **आजादी का अमृत महोत्सव** या उपक्रमाअंतर्गत **'भारत की नदियों का उत्सव'** या विषयावर महाविद्यालयातील **ग्रंथपाल डॉ. दिगांबर खोब्रागडे** यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्य डॉ. के. जी. चौधरी हे होते.















डॉ. दिगंबर खोब्रागडे यांचे व्याख्यान

## भालोद महाविद्यालयात उलगडला नद्यांचा इतिहास

विचार व्यक्त करताना डॉ. खोब्रागडे. सोबत मान्यवर.

देशोन्नती 15 जानेवारी 2022 भुसावळ प

# भारतीय नद्यांची शुद्धता, पवित्रता जपावी -डॉ. खोब्रागडे

■ आजादी अमृत महोत्सवात नद्यांवर व्याख्यान



देशोन्नती वृत्तसंकलन...

भालोद ■ नद्यांची शुद्धता व पवित्रता जपण्याचे आवाहन रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिगंबर खोब्रागडे यांनी केले. भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाअंतर्गत भारत की नदियों का उत्थान या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के.जी. चौधरी हे होते. प्रारंभी तामिळनाडूमधील कुन्नूर येथे झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात देशाचे पहिले संरक्षण दल प्रमुख जनरल बिपिन रावत, त्यांच्या पत्नीसह लष्करातील बारा अधिकाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. डॉ. खोब्रागडे यांनी पुढे बोलताना म्हणाले की, सुरुवातीला उत्तर व दक्षिण भारतातून वाहणाऱ्या नद्या, पूर्व व पश्चिम भारतातून वाहणाऱ्या नद्यांविषयी माहिती दिली. हिमालय पर्वत, सातपुडा पर्वत, विंध्य पर्वत, अरवली पर्वत, सह्याद्री पर्वतातून उगम पावणाऱ्या नद्यांविषयी माहिती दिली.

जम्मू- काश्मीर, हिमाचल प्रदेश, दिल्ली, हरियाणा व पंजाब राज्यातून वाहणाऱ्या नद्या, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान या राज्यातून वाहणाऱ्या नद्या, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगाना, कर्नाटक व केरळ या राज्यातून वाहणाऱ्या नद्या तसेच उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, झारखंड, छत्तीसगड, ओरिसा, पश्चिम बंगाल, आसाम या राज्यातून वाहणाऱ्या नद्या व त्यांच्या उपनद्या आणि अरुणाचल प्रदेश, मिझोरम, मेघालय, मणिपूर, सिक्किम, त्रिपुरा, नागालँड या पूर्वेकडील राज्यातून वाहणाऱ्या नद्या त्यांची उगम स्थाने, वाहण्याच्या प्रवाहाच्या दिशा इ. विषयी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. त्यांनी मार्गदर्शनात सांगितले की, भारतातील प्रमुख नद्या गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, गोदावरी, कृष्णा, कावेरी, नर्मदा, अलकनंदा, महानंदा, मंदाकिनी, चंबळ, सतलज, सिंधू, रावी, चिनाब, झेलम, व्यास, तापी, पूर्णा, गिरणा, वाघूर, तुंगभद्रा, कोसी, भागिरथी, घागरा, भिमा, मुळा- मुठा, गोमती, बेटवा, साबरमती, दामोदर, लुनी, पैनगंगा, कोयना, कालिनी, इंद्रावती, तेरणा, तुंगभद्रा, प्राणहिता, शारदा, वैनगंगा, पेरियार, पंचगंगा व सह्याद्री पर्वतातून पश्चिमेकडे वाहणाऱ्या ज्या नद्या अरबी समुद्राला जाऊन मिळतात इ. नद्यांविषयी भारताच्या प्रत्येक राज्याच्या नकाशानुसार वरील नद्यांची सविस्तर माहिती वर्णन करून सांगितली. तसेच गंगोत्री, यमुनोत्री, अमरकंटक व त्र्यंबक या ठिकाणी उगम पावणाऱ्या नद्या व त्याठिकाणचे सांस्कृतिक व धार्मिक महत्त्व विषद केले.

त्यांनी प्रमुख नद्यांची उगमस्थाने, त्यांच्या वाहण्याच्या दिशा, उगम स्थानांचे सांस्कृतिक व धार्मिक महत्त्व तसेच यातील प्रमुख नद्यांवर बांधलेली धरणे, त्यांच्यामुळे स्थानिक पातळीवर होणारे कृषी सिंचन, विद्युत निर्मिती, महानगरांना व मोठ्या शहरांना होणारा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा यावर मार्गदर्शन केले. वरील नद्यांच्या काठावर वसलेली प्राचीन काळापासूनची शहरे, त्यांचे राजकीय महत्त्व, सांस्कृतिक व धार्मिक महत्त्व, त्याठिकाणी होणाऱ्या प्रदूषणाची कारणे, त्यामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान, भविष्य काळात होणारे पर्यावरणाचे प्रदूषण, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे स्रोत प्रदूषित होऊ नये याकरिता सर्वांनी स्थानिक पातळीवर घ्यावयाची दक्षता आदीबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**Date: 21/12/2021**

# भालोद महाविद्यालयात आजादी का अमृत महोत्सव या उपक्रमाअंतर्गत 'विजय सप्ताह (१३ ते १९ डिसेंबर २१)' या विषयावर व्याख्यान

**भारतीय सैन्याच्याअतुल्य पराक्रमाची शौर्यगाथा म्हणजे १९७१ चे भारत व पाकिस्तान युद्ध - प्रा. डॉ.सुनिल नेवे**

भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **आजादी का अमृत महोत्सव** या उपक्रमा अंतर्गत **विजय सप्ताह साजरा** करण्यात आला. त्यानिमित्ताने '**विजय सप्ताह (१३ ते १९ डिसेंबर २१)**' या विषयावर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख **प्रा. डॉ. सुनिल नेवे** यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस्. कोल्हे हे होते.












**Date: 30/12/2021**

# भालोद महाविद्यालयात 'माझी कमाई माझा स्वाभिमान' या विषयावर व्याख्यान

भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **'माझी कमाई माझा स्वाभिमान'** या विषयावर ' **सौ. वर्षा चोपडे- इंगळे** संचालिका ऑरिफ्लेम इंडिया' यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस्. कोल्हे हे होते. सौ. वर्षा चोपडे- इंगळे यांनी आपल्या भाषणाच्या सुरवातीला महिलांच्या आर्थिक सबलिकरणावर भर दिला. आजच्या तरुणींनी उच्च शिक्षणतर घ्यावेच त्याचबरोबर आपल्या कुटुंबासाठी सुद्धा अर्थार्जन करावे व कुटुंबाला हातभार लावावा. त्यांनी उपस्थित विद्यार्थीनींना उच्च शिक्षण घेतांनाच आपल्यावर झालेला संस्कारांची शिदोरी घेऊन शिक्षण घ्यावे. संस्कारांची शिदोरी बरोबर ठेवा या शिदोरीवरच तुम्ही भाविष्यात मोठे होणार आहात असे संबोधन केले.















देशदूत दि. ०८ जानेवारी २०२२
पान नं. ७

## भालोद महाविद्यालयात‘माझी कमाई माझा स्वाभिमान’ विषयावर व्याख्यान

▸▸ भालोद । वार्ताहर –

सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे म माझी कमाई माझा स्वाभिमान म या विषयावर सौ. वर्षा चोपडे- इंगळे संचालिका ऑरिफ्लेम इंडिया यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयांचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए.एस. कोल्हे हे होते.

सौ. वर्षा चोपडे- इंगळे यांनी आपल्या भाषणाच्या सुरवातीला महिलांच्या आर्थिक सबलिकरणावर भर दिला. आजच्या तरुणींनी उच्चशिक्षण तर घ्यावेच त्याच बरोबर आपल्या कुटुंबासाठी सुद्धा अर्थार्जन करावे व कुटुंबाला हातभार लावावा. त्यांनी उपस्थित विद्यार्थीनींना उच्चशिक्षण घेतांनाच आपल्यावर झालेला संस्कारांची शिदोरी घेऊन शिक्षण घ्यावे. संस्कारांची शिदोरी बरोबर ठेवा या शिदोरीवरच तुम्ही भाविष्यात मोठे होणार आहात असे संबोधन केले.

भविष्यात चांगले सन्मानाचे जीवन जगण्यासाठी, चांगल्या नौकरीसाठी प्रयत्न करावेत जर ते जमले नाही तर चांगल्या व्यवसायाची निवड करावी. नौकरी, व्यवसाय, स्वंयरोजगार करतांना तो प्रामाणिकपणे व मनलावून करा. त्यामुळे मिळणाऱ्या कमाईचा स्वतःला स्वाभिमान वाटेल. त्यांनी आपल्या भाषणात दैनंदिन जीवनात कुटुंबातील महिला कुटुंबाला कशा हातभार लावतात हे सोदाहरणे देऊन सांगितले. ग्रामीण भागात महिला शेतात काम करतात व त्यातुन कुटुंबासाठी अर्थार्जन करतात. शहरात काही महिला धुणी–भांडी, झाडणे–फर्चीपुसणे इ. कामे करतात व कुटुंबासाठी अर्थार्जन करतात. त्यांना त्यांच्या स्व कमाईचा स्वाभिमान वाटतो. त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्याथीनींना व्यवसायाच्या व स्वंयरोजगाराच्या विविध संधी बद्दल माहिती दिली.

ऑनलाईन सौंदर्यप्रसादनांच्या प्रोडक्टस् बद्दल व यामध्ये असलेल्या व्यवसायाच्या संधी बाबत तसेच शिक्षण घेतांना आपण अर्थार्जन करून आपल्या कुटुंबाला कशा पध्दतीने हातभार लावू शकतो याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कोल्हे यांनी आजच्या तरुणींनी भविष्याचा वेध घेऊन उच्च शिक्षण घ्यावे व स्वंयरोजगार निर्माण करावा व अर्थार्जन करावे आणि कुटुंबाला हातभार लावावा असे संबोधन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पद्माकर सावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दिनेश महाजन यांनी केले. या कार्यक्रमास प्रा. डॉ. सुनिल नेवे, प्रा. हेमलता कोल्हे, प्रा. शैलेजा इंगळे, प्रा. मौसमी चौधरी व महाविद्यालयातील विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. मुबारक तडवी, श्री. पंकज नेहेते, श्री. तुळशिराम पाटील, श्री. किशोर चौधरी व रासेयो स्वयंमसेवकांनी परिश्रम घेतले.

**Date: 25/01/2022**

# भालोद महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त व्याख्यान व शपथ कार्यक्रम उत्साहात साजरा

दि. **२५/०१/२०२२** रोजी कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **राष्ट्रीय मतदार दिन** उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. के. जी. चौधरी हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख **प्रा. डॉ. सुनिल नेवे** हे होते. त्यांचे **'राष्ट्रीय मतदार दिन-लोकशाहीचा जागर'** या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले.




जळगाव तरुण भारत

जळगाव । रविवार । दि. ३० जानेवारी २०२२ । युगाब्द ५१२३ । वर्ष : २७ । अंक : १७६ । मूल्य ३ रुपये । पृष्ठे ८

## भालोद महाविद्यालयात मतदार दिन साजरा

**फैजपूर** : सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. के. जी.चौधरी हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिल नेवे हे होते. त्यांचे राष्ट्रीय मतदार दिन- लोकशाहीचा जागर ' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. प्रा. डॉ. सुनिल नेवे यांनी नवमतदारांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस हा सन २०११ पासून संपूर्ण देशभरात 'राष्ट्रीय मतदार दिन ' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, नाव नोंदणी करून घेण्याचे आवाहन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी.ए. सावळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी मानले. कार्यक्रमास रासेयो रावेर विभाग समन्वयक प्रा. डॉ.आशुतोष वर्डीकर, प्रा.डॉ. दिनेश पाटील, प्रा.राकेश चौधरी, प्रा.मोहिनी तायडे, मुबारक तडवी आदी उपस्थित होते.


देशदूत दि.३१ जानेवारी २०२२ पान ३

## भालोद महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त व्याख्यान व शपथ कार्यक्रम

भालोद, ता. यावल । वार्ताहर

दि.२५ रोजी सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. के. जी. चौधरी हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनिल नेवे हे होते. त्यांचे म राष्ट्रीय मतदार दिन-लोकशाहीचा जागर म या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले.

प्रा. डॉ. सुनिल नेवे यांनी नवमतदारांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, आज आपण १२ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करीत आहोत. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर दि. २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस हा सन २०११ पासून संपूर्ण देशभरात म राष्ट्रीय मतदार दिन म म्हणून साजरा करण्यात येतो. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव नांदणीसाठी प्रोत्साहण देणे, सुलभरित्या त्यांची नाव नोंदणी करून घेणे हा आहे. देशातील मतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणूक प्रक्रियेत सहभाग वाढावा म्हणून त्यांना जागरूक करण्यासाठी केला जातो हे सांगितले.

त्यांनी आपल्या भाषणात जगातील विविध देशांत असलेल्या लोकशाही मध्ये मतदारांच्या वयाची तुलना करून सांगितले की, वय वर्षे १८ ते वय वर्षे २५ पर्यंत विविध देशात मतदाराचे मतदान करण्याचे वय निश्चित करण्यात आलेले आहे. भारतामध्ये मतदान करण्याचे वय वर्षे १८ हे आहे. वयाची १८ पूर्ण झालेला व्यक्ती त्याचा मतदानाचा हक्क लोकशाही मध्ये निर्भयपणे बजावतो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली संविधानातील लोकशाही निर्माण करण्यासाठी आपल्याला मिळालेला मतांचा योग्य वापर करणे, मतदानासंबंधी जागृती करणे, मतदानाच्या अधिकारांची जाणीव निर्माण करणे, मतदान केंद्रावर जावून मतदानाचा हक्क बजावणे, आपले मत हा आपला आवाज आहे. तो आपला अधिकार व हक्क आहे. सक्षम लोकशाहीचा आधार आहे. त्यामुळे प्रत्येकाने जागरूक व जबाबदार मतदार बनने, डोळसपणे व निर्भयपणे मतदान करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे प्रतिपादन केले. त्यांच्या भाषणा नंतर लोकशाही संवर्धनासाठी, मतदानाविषयी जागृती निर्माण होण्यासाठी व लोकशाहीवर निष्ठा निर्माण होण्यासाठी सामुहिक शपथ घेण्याचा कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी.ए. सावळे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व उपस्थितांना शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी केले. सदर कार्यक्रमास रासेयो रावेर विभाग समन्वयक प्रा. डॉ. आशुतोष वर्डीकर , प्रा. डॉ. दिनेश पाटील, प्रा. राकेश चौधरी, प्रा. मोहिनी तायडे, श्री. मुबारक तडवी आदी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**Date: 08/03/2022**

## माझी वसुंधरा अभियान-भाग २ अंतर्गत अग्नी, वायु, पृथ्वी, आकाश, जल यांचे सरंक्षण व संवर्धन करण्यासाठी रोगांळी, वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन

भालोद येथे ग्रामपंचायत भालोद व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **माझी वसुंधरा अभियान-भाग २** अंतर्गत अग्नी, वायु, पृथ्वी, आकाश व जल यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा, बायोगॅसचा वापर, सौर ऊर्जेचा वापर, घनकचरा व्यवस्थापन, प्लॅस्टिक बंदी, फटाके मुक्त सण साजरे करणे, निर्माल्य संकलन, इलेक्ट्रीकल वाहनांचा वापर करणे, परस बाग, वृक्ष लागवड व संवर्धन इ. विषयांवर **रांगोळी, वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे** आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. वर्षा नेहेते ह्या होत्या. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भालोद गावचे सरपंच मा.श्री. प्रदिपदादा कोळी हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी. ए. सावळे यांनी केले व या स्पर्धांच्या आयोजना मागील भूमिका समजावून सांगितली. या सर्व स्पर्धांचे उद्‌घाटन डॉ. वर्षा नेहेते व मा.श्री. प्रदिपदादा कोळी यांच्या शुभ हस्ते दिप प्रज्वलनाने करण्यात आले.


























# भालोद महाविद्यालयात माझी वसुंधरा अभियानांतर्गत रांगोळी, वक्तृत्व, निबंध स्पर्धा

**भालोद, ता.यावल । वार्ताहर**

सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे ग्रामपंचायत भालोद व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियान- भाग २ अंतर्गत अग्नी, वायु, पृथ्वी, आकाश व जल यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा, बायोगॅसचा वापर, सौरऊर्जेचा वापर, घन कचरा व्यवस्थापन, प्लॅस्टिक बंदी, फटाके मुक्त सण साजरे करणे, निर्माल्य संकलन, इलेक्ट्रीकल वाहनांचा वापर करणे, परस बाग, वृक्ष लागवड व संवर्धन इ. विषयांवर रांगोळी, वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. वर्षा नेहेते ह्या होत्या. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भालोद गावचे सरपंच मा.श्री. प्रदिप दादा कोळी हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी. ए. सावळे यांनी केले व या स्पर्धांच्या आयोजना मागील भूमिका समजावून सांगितली. या सर्व स्पर्धांचे उद्घाटन डॉ. वर्षा नेहेते व मा.श्री. प्रदिपदादा कोळी यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आले.

या कार्यक्रमात निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्रथम वर्ष विज्ञान वर्गाची विद्यार्थीनी कु. प्रतिक्षा सुनिल पाटील, द्वितिय क्रमांक कु. नेहा इच्छाराम बरडे व तृतीय क्रमांक कु. नैना प्रकाश जलंधर तर उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक कु. लोकाक्षी कल्याण चौधरी, उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांक कु.स्नेहा दिलीप पारधे यांनी मिळवीला.या निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. जतिनकुमार मेढे यांनी काम पाहिले.

वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक तृतिय वर्ष विज्ञान वर्गाची विद्यार्थीनी कु. पुनम चंद्रकांत ठोंबरे व द्वितीय क्रमांक प्रथम वर्ष विज्ञान वर्गाची विद्यार्थीनी कु. नैना प्रकाश जलंधर या विद्यार्थ्यांनीनी मिळविला. वक्तृत्व स्पर्धेचे परींक्षक म्हणून गणित विभाग प्रमुख प्रा. काशिनाथ पाटील व मराठी विभागातील प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी काम पाहिले.

तर रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. लोकाक्षी कल्याण चौधरी , द्वितिय क्रमांक कु. भाग्यश्री अशोक देशमुख व तृतिय क्रमांक कु. दुर्गेश्वरी महेंद दांडगे या प्रथम वर्ष विज्ञान वर्गाच्या विद्यार्थीनींनी मिळविला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. हेमंत इंगळे व प्रा. सपना नारखेडे यांनी काम पाहिले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्राम विकास अधिकारी सुनिल गोसावी ग्रामपंचायत भालोद, प्रा.डॉ. दिनेश महाजन, प्रा.दिनेश पाटील, प्रा. मोहिनी तायडे, प्रा.सपना नारखेडे, प्रा.योगिता चौधरी, प्रा. मौसमी चौधरी, प्रा. हेंमलता कोल्हे, प्रा. शैलेजा इंगळे, वानखेडे, मुबारक तडवी, तुळशिराम पाटील, बाळकृष्ण चौधरी, पंकज नेहेते, चंद्रकांत लोखंडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक बंधु- भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी- विद्यार्थीनीं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशदूत 23/3/22